**नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २०/०८/२०२०रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातुन मागील विचाराधीन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरीता महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि (१४) दि.०३.०७.२०२० तसेच मनपा सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि.०३.०७.२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Vedio Conferencing व्दारे भरलेल्या सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त.**

<u>उपस्थित सभासद</u>

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१६** | **ड** | **संदीप दिवाकर जोशी** | **महापौर** |
| २. | **२६** | **क** | **मनिषा सुनिल कोठे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ५. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ६. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ७. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| ८. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| ९. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १०. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| ११. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १२. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १३. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| १४. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १५. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| १६. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| १७. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| १८. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| १९. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २०. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २१. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| २२. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| २३. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| २४. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| २५. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| २६. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| २७. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| २८. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| २९. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ३०. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ३१. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ३२. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ३३. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ३४. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ३५. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ३६. | १९ | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| ३७. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ३८. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ३९. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ४०. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ४१. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ४२. | २३ | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| ४३. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ४४. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ४५. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ४६. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ४७. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ४८. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ४९. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ५०. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ५१. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ५२. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ५३. | २७ | ड | हरीश सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ५४. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ५५. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ५६. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ५७. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ५८. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ५९. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ६०. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ६१. | ३१ | ब | सतिश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ६२. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ६३. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ६४. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ६५. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ६६. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ६७. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ६८. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ६९. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ७०. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ७१. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ७२. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ७३. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ७४. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ७५. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ७६. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| ७७. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ७८. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ७९. | ना.स. | | सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |
| ८०. | ना.स. | | गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना पोकुलवार | सदस्य |
| ८१. | ना.स. | | निशांत गिरीश गांधी | सदस्य |
| ८२. | ना.स. | | किशोर दामोदर जिचकार | सदस्य |
| ८३. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| ८४. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ८५. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| २. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ३. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ४. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ५. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ६. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ७. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ८. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ९. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| १०. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| ११. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १२. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १३. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १४. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| १५. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| १६. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| १७. | ८ | ब | अंसारी सय्यदा बेगम मो. निजामुद्दीन | सदस्या |
| १८. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| १९. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| २०. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| २१. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| २२. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| २३. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २४. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| २५. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २६. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| २७. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| २८. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| २९. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ३०. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ३१. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ३२. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ३३. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ३४. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ३५. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ३६. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ३७. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ३८. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ३९. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ४०. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ४१. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ४२. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ४३. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ४४. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ४५. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ४६. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ४७. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ४८. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ४९. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ५०. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ५१. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ५२. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ५३. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ५४. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ५५. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ५६. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ५७. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ५८. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ५९. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ६०. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ६१. | ३५ | क | विशाख प्रकाश मोहोड | सदस्या |
| ६२. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ६३. | ३८ | अ | उज्जवला वसंतराव बनकर | सदस्या |
| ६४. | ना.स. | | किशोर रामकृष्ण वानखेडे | सदस्य |
| ६५. | ५ | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| ६६. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ६७. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| ६८. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ६९. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ७०. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ७१. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |

<u>उपस्थित अधिकारी</u>

| | |
|---|---|
| श्री. तुकाराम मुंढे | निगम आयुक्त |
| श्री. सुभाष जयदेव | निगम सचिव (प्र.)/उपायुक्त |

**मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.**

**<u>ठराव क्रमांक ८२</u>** :– मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील शोक प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने दोन मिनिटे शांत चित्ताने उभे राहून मृतात्म्यास मूक श्रध्दाजंली अर्पण करुन शोक प्रस्तावास सभाग्हाने एकमताने मान्यता प्रदान केली.

## शोक प्रस्ताव

## शिवाजीराव पाटील निलंगेकर

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे दिनांक 06/08/2020 रोजी निधन झाले. ते 88 वर्षाचे होते. शिवाजीराव निलंगेकर मुख्यमंत्री तसेच मंत्री असताना त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. मराठवाडा, विदर्भ विकासाची त्यांनी पायाभरणी केली. रोजगार हमीवरच्या मजुरांना मजुरीशिवाय दररोज धान्य देण्याची क्रांतिकारी योजना त्यांनी राबविली. तालुक्याच्या ठिकाणी एमआयडीसी सुरू करण्याचा निर्णय डॉ. निलंगेकर यांचाच होता. 1962 पासून सातत्याने ते निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते. नऊ वेळा विधानसभेवर तर एकदा विधान परिषदेवर ते निवडून गेले होते. 41 वर्षे विधिमंडळात राहिले. 3 जून 1985 ते 7 मार्च 1986 या कालावधीत ते राज्याचे मुख्यमंत्री होते. राज्याच्या मंत्रिमंडळात प्रदीर्घकाळ त्यांनी अनेक खात्यांचा पदभार सांभाळला.

## लालजी टंडन

मध्यप्रदेशचे राज्यपाल लालजी टंडन यांचे दिनांक 21/07/2020 रोजी निधन झाले. ते 85 वर्षाचे होते.लालजी टंडन यांनी भाजपातर्फे लखनौ लोकसभा मतदारसंघाचे 2009 ते 2014 पर्यंत प्रतिनिधीत्व केले. त्यानंतर त्यांना बिहार व मध्यप्रदेशाचे राज्यपालपदाची जबाबदारी देण्यात आली होती.

## संगीत मार्तंड पं. जसराज

भारतीय शास्त्रीय संगीतातील ख्यातनाम गायक पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित असलेले पंडित जसराज यांचे अमेरिकेतील न्यूजर्सी शहरामध्ये दि. 18/08/2020 रोजी निधन झाले. ते 90 वर्षाचे होते मेवाती घराण्याचे गायक असलेल्या पं. जसराज यांनी आठ दशके संगीतसेवा केली. त्यांच्या अतुलनीय कामगिरीमुळे त्यांना संगीत मार्तंड असेही संबोधले जात असे. पं. जसराज यांना पद्मश्री, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, पद्मभूषण, पद्मविभूषण सह विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. वयाच्या 90 व्या वर्षीही जसराज हे स्काईपच्या माध्यमातून त्यांच्या काही आंतराष्ट्रीय विद्यार्थ्यांना शिकवत होते. गेल्या वर्षी पद्मविभूषण पंडित जसराज यांचे नाव मंगळ व गुरू या दोन ग्रहांमधील व्हीपी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ग्रहाला देण्यात आले. असा सन्मान मिळालेले पं. जसराज एकमेव भारतीय संगीत कलाकार आहेत.

## चेतन चौहान

भारताचे माजी क्रिकेटपटू आणि उत्तरप्रदेशाचे कॅबिनेट मंत्री चेतन चौहान यांचे कोरोना उपचारादरम्यान दिनांक 16/08/2020 रोजी निधन झाले. ते 73 वर्षाचे होते.बारा वर्षांच्या दीर्घ क्रिकेट

कारकीर्दीत चेतन चौहान यांनी भारतासाठी 40 कसोटी  आणि 7 एकदिवसीय सामने खेळले. 1981 मध्ये त्यांना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## राम प्रधान

माजी केंद्रीय गृह सचिव व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव राम प्रधान यांचे दिनांक 01/08/2020 रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. ते 92 वर्षाचे होते.राम प्रधान यांनी तब्बल 36 वर्षाच्या प्रदीर्घ प्रशासकीय सेवेत गृह, संरक्षण, वाणिज्य विभागाचे सचिव म्हणून भरीव कामगिरी केली. राज्यात आणि केंद्रात विविध पदे भूषवितानाच संयुक्त राष्ट्रसंघातील जबाबादाऱ्या पार पाडल्या. केंद्रीय गृह सचिव पदावरून निवृत्त झाल्यानंतर 1987 ते 90 या कालावधीत ते अरूणाचल प्रदेशचे राज्यपालही होते. 1987 साली त्यांना पद्मभूषणनेही सन्मानित करण्यात आले.

## नीला सत्यनारायण

महाराष्ट्राच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त आणि निवृत्त सनदी अधिकारी नीला सत्यनारायण यांचे दिनांक 17/07/2020 रोजी कोरोना या आजारामुळे निधन झाले. त्या 72 वर्षाच्या होत्या. प्रशासकीय सेवेत तब्बल 34 वर्षे कार्यरत राहिलेल्या नीला सत्यनारायण या एक उत्तम सनदी अधिकारी होत्या. निवृत्तीनंतर 6 जुलै 2009 मध्ये राज्य निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. लेखिका, दिग्दर्शक म्हणूनही त्यांची कारकीर्द चांगली गाजली. ललित पुस्तके, काव्यसंग्रह तसेच मार्गदर्शनपर आणि अनुवादित अशा 35 पुस्तकांचे त्यांनी लेखन केले.

## विजय मुडे

भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार विजय अण्णाजी मुडे यांचे दिनांक 15/08/2020 रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते 78 वर्षाचे होते.

## राहत इंदौरी

प्रसिध्द शायर गीतकार राहत इंदौरी यांचे दिनांक 11/08/2020 रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते 70 वर्षाचे होते. राहत इंदौरी हे प्रसिध्द शायर होते, त्याचबरोबर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी गीतलेखन केले आहे. उर्दू साहित्याचे ते अभ्यासक होते.

## कॅप्टन दीपक साठे

भारतीय वायुसेनेत आपल्या कामगिरीने 'सोअर्ड ऑफ ऑनर' यासह वायुसेनेची सर्व पदके मिळविणारे आणि एअर इंडियामध्ये आपली सेवा देणारे मूळचे नागपूरचे असलेले दीपक वसंत साठे यांचे दिनांक 08/08/2020 रोजी निधन झाले. वायुसेनेतील सेवेनंतर ते एअर इंडीयामध्ये वैमानिक म्हणून कार्यरत होते. 'वंदे भारतम्' अभियानादरम्यान दुबईहून भारतात येणाऱ्या विमानाऱ्या विमानाला कोझीकोडी या विमानतळावर उतरताना अपघात झाला. अखेरच्या क्षणापर्यंत ते विमानातील प्रवाशांचे प्राण वाचावेत यासाठी प्रयत्नरत होते. मात्र नियतीने त्यांच्यावर घात घातला. मूळचे नागपूरचे असलेले कॅप्टन दीपक साठे यांचे वडीलही भारतीय सेनेत कर्नल या पदावर कार्यरत होते. त्यामुळे सेनेत जेथे जेथे ते वास्तव्यास होते. तेथे–तेथे त्यांचे शिक्षण झाले. एनडीए केल्यानंतर भारतीय वासुसेनेत ते रूजू झाले.

## ले. जनरल रवींद्र थोडगे

लष्करी सेवेतील परमविशिष्ट सेवा मेडल, अतिविशिष्ट सेवा मेडल, आणि विशिष्ट सेवा मेडल आदी पदकांनी सन्मानित विविध मोहिमांवर यशस्वी कारकीर्द गाजविणारे लेफ्टनंट जनरल रवींद्र थोडगे यांचे दिनांक 11/07/2020 रोजी निधन झाले. ते 64 वर्षाचे होते. लष्करी सेवेत जनरल थोडगे यांची गोरखा रेजिमेंटचे आधारस्तंभ म्हणून ओळख होती. कारगील युध्दाच्या वेळी त्यांची तुकडी आघाडीवर होती. त्याचप्रमाणे भारतीय संसदेवरील हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने राबविलेलया ऑपरेशन पराक्रमचे देखील ते प्रमुख होते. सध्या ते विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून काम पाहत होते.

## भंते सदानंद

अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे अध्यक्ष संघानुशासक भंते संदानंद महास्थवीर यांचे दिनांक 04/08/2020 रोजी निधन झाले. ते 81 वर्षाचे होते.

## डॉ. आत्माराम उखळकर

जी.एस. कॉमर्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.आत्माराम एस. उखळकर यांचे दिनांक 22/06/2020 रोजी निधन झाले. ते 85 वर्षाचे होते. प्रा. उखळकर यांनी विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर काम केले आहे. मूळचे गांधीवादी असलेले डॉ. उखळकर हे 1982 ते 1995 या कालावधीत जी.एस. कॉमर्स महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत होते.

## श्रीपाद चितळे

शहरातील ज्येष्ठ इतिहासतज्ञ, पुरातत्व संशोधक, लेखक व संस्कार भारतीचे माजी अखिल भारतीय प्राचीन कला विधा संयोजक डॉ. श्रीपाद चितळे यांचे दिनांक 02/08/2020 रोजी निधन झाले. ते 64 वर्षाचे होत.श्रीपाद चितळे हे एक व्यासंगी अभ्यासू व त्यांच्या पुरातत्वविषयक संशोधनाला समर्पित असे व्यक्तिमत्व होते. त्याच अनुषंगाने त्यांनी नागपूरात 'हेरिटेज वॉक' हा उपक्रम सुरू केला.

## मुरलीधर शिंगोटे

दैनिक पुण्यनगरीचे संस्थापक–संपादक मुरलीधर अनंता ऊर्फ बाबा शिंगोटे यांचे दिनांक 07/08/2020 रोजी निधन झाले. ते 82 वर्षाचे होते. मुरलीधर शिंगोटे यांनी वृत्तपत्र विक्रेता ते दैनिकाचे संस्थापक असा प्रवास त्यांनी केला. 1994 मध्ये मुंबई चौफेर नावाचे सायंदैनिक सुरू केले. यानंतर दैनिक आपला वार्ताहर, दैनिक यशोभूमी, दैनिक कर्नाटक, मल्ला, तामिळ टाइम्स, हिंदमाता ही दैनिके सुरू केली त्यांनी दैनिक पुण्यनगरीची मुहूर्तमेढ 1999 मध्ये रोवली.

## देवा उसरे

गड्डीगोदाम भागाचे दोन वेळा प्रतिनीधीत्व केलेले माजी नगरसेवक देवा उसरे यांचे दिनांक 16/08/2020 रोजी निधन झाले. ते 52 वर्षाचे होते.

## पुरूषोत्तम टांक

प्रभाग क्रमांक 24 च्या नगरसेविका श्रीमती चेतना टांक यांचे सासरे तथा टिंबर मर्चंट असोसिएशचे माजी अध्यक्ष पुरूषोत्तम जयराम टांक यांचे दिनांक 14/3/2020 रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. ते 90 वर्षाचे होते. ते विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यात अग्रेसर होते.

## रामराव धोटे

प्रभाग क्रमांक 14 च्या नगरसेविका शिल्पा धोटे यांचे सासरे श्री. रामराव धोटे यांचे दिनांक 18/08/2020 रोजी हृदयविकाराने निधन झाले. ते 65 वर्षाचे होते. ते विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यात अग्रेसर होते. उपरोक्त सर्व मान्यवरांच्या निधनाबद्दल म.न.पा.च्या या सभेस अत्यंत दुःख होत आहे. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढविलेल्या या दुःखद प्रसंगी त्यांना तोंड देण्यास धैर्य प्रदान करो, हीच प्रभू चरणी प्रार्थना.

**श्रध्दांजली** **कोव्हिड योध्दा**

नागपूर शहरात कोव्हिड–19 चा प्रादुर्भाव झाल्यानंतर डॉक्टर्स, वैद्यकीय कर्मचारी, सफाई कर्मचारी, पोलिस यांचेसह संपूर्ण आरोग्य यंत्रणा, जिल्हा प्रशासन, मनपा व नगरपालिका प्रशासन आणि पोलिस प्रशासन यांनी कोरोना योध्दा म्हणून आपली भूमिका चोखपणे बजावली आहे. या काळात प्रत्यक्ष कर्तव्य बजावतांना काहींना कोरोनाची लागण झाली आणि त्यात या कोरोना योध्दांचा मृत्यू झाला. त्यांच्या या बलीदाना बद्दल म.न.पा.च्या या सभागृहास अत्यंत दुःख होत असून हे सभागृह या सर्व शहीद कोव्हिड योध्दांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढविलेल्या या दुःखद प्रसंगी त्यांना तोंड देण्यास धैर्य प्रदान करो, हीच प्रभू चरणी प्रार्थना.

यानंतर मा. महापौरजी यांनी 2 मिनिट उभे राहून मृतात्म्यास श्रद्धांजली अर्पण केली.

वंदे मात्रम नंतर मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

**ठराव क्रमांक ८३** :– मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**अभिनंदन प्रस्ताव**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदी डॉ. सुभाष चौधरी यांची निवड झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे

**नरेंद्र हिवरे**

भारत सरकार गृह मंत्रालय, नवी दिल्लीतर्फे देण्यात येणाऱ्या सर्वोकृष्ट तपासाकारीता केंद्रीय गृहमंत्री पदक 2020 हे लकडगंज पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नरेंद्र कृष्णराव हिवरे यांना जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**चंद्रकांत चन्ने**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या 97 वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी नामवंत चित्रकार चंद्रकांत चन्ने यांचा विद्यापीठातर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनसाधना पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**राममंदीर भूमिपूजन**

प्रत्येक भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या अयोध्येतील राम मंदीराचा भूमिपूजन सोहळा 5 ऑगस्ट, 2020 रोजी देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडला. शास्त्रोक्त विधिवत पध्दतीने राम मंदीराचे भूमिपूजन झाले आणि देशातीत सर्व मंदिरामध्ये 'जय श्रीराम' असा जयघोष झाला. रामजन्मभूमीच्या पवित्र स्थानावर भव्य राममंदीर उभारणे हे राष्ट्रीय एकात्मतेचे कार्य आहे. हे मंदीर भावी पिढयांना आस्था, श्रध्दा व संकल्पाची प्रेरणा देत राहील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी व्यक्त करीत सर्वच देशवासियांचे अभिनंदन केले. हा ऐतिहासिक सोहळा देशभरातील नागरिकांनी अनुभवला.

## म.न.पा. 10 वी आणि 12 वी परीक्षेत उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थांचे हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी–मार्च 2020 मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत नागपूर महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांनी चांगली बाजी मारली आहे. या सर्व शाळांचा निकाल 85.28 टक्के लागला. तसेच बारावीच्या परीक्षेत तिन्ही शाखांचा सरासरी निकाल 88.00 टक्के लागला. मागील वर्षीच्या तुलनेत म.न.पा. शाळांचे हे यश कौतुकास्पद असून या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम व्दितीय व तृतीय क्रमांकासह गुणवत्ता प्राप्त करून नगरीचे नांव लौकिक केल्याबद्दल सर्व म.न.पा. शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांसह शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा विषेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**(मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले.)**

महापौर:- या ठिकाणी निगम सचिवांनी स्थगण प्रस्तावाचे वाचन करावे.

निगम सचिव :- नागपूर महानगरपालिका शहराच्या हद्दीमध्ये दिवसेंदिवस कोवीड – १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव व प्रसार अत्यंत वेगाने वाढत आहे. महानगरपालिकेव्दारे संचालीत करणारे दवाखाने हे ओ.पी.डी. स्वरुपाचे असून त्यामध्ये डॉक्टर व सेवेकरी व नर्सींग स्टाफ अत्यल्प आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व मेयो हॉस्पीटल या रुग्णालयात बेडची संख्या रुग्णांची सेवा करण्याची दृष्टीने कमी पडत आहे, काही मोजकेच खाजगी हॉस्पीटल कोव्हीड – १९ च्या रुग्णांना सेवा देत असून राज्य शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे हे हॉस्पीटल शुल्क आकारत नाही. अशा नागरिकांच्या तक्रारी आहे. रुग्णांची दिवसेंदिवस वाढणारी संख्या बघता नागपूर शहरातील ज्या खाजगी रुग्णालयात सर्व सोई आहे अशी खाजगी रुग्णालये सुध्दा यामध्ये समाविष्ट करणे गरजेचे आहे.

साथ नियंत्रण कायदा अंतर्गत व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा अंतर्गत अशा रुग्णालयाचे अधिग्रहण व संपादन करुन कोव्हीड – १९ च्या कालावधीपुर्ती करावयास पाहिजे या दृष्टीने प्रशासनाने आता पर्यत साथीच्या रोगा संबंधित नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने काय काय उपाययोजना केल्या, या साथीच्या रोगाच्या प्रादुर्भाव ऐवढया वेगाने का वाढतो आहे. या रोगाचा प्रसार सार्वजनिक प्रकारामध्ये येतो काय याची कारणमिमांसा करण्यासाठी जनहितार्थ निर्णय घेण्यासाठी हा स्थगण प्रस्ताव चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी स्वीकृत करावा.

महापौर :- स्थगन प्रस्तावावर चर्चेला सुरुवात करावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हा स्थगण प्रस्ताव कोणत्या सन्माननिय सदस्यांनी दिलेला आहे त्या संदर्भात माहिती दयावी.

निगम सचिव :- मा.महापौरजी, श्री.दयाशंकर तिवारी यांचा स्थगण प्रस्ताव आहे.

महापौर :- स्थगण प्रस्तावावर चर्चा करण्यास श्री.दयाशंकर तिवारी यांनी प्रारंभ करावा.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, स्थगण प्रस्ताव रखने का यह औचित्य है की,

महापौर :- सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती आहे की सर्वांनी आपआपले मोबाईल म्युट करावे, आवाज काहीच येत नाही. श्री.दयाशंकरजी तिवारी यांनी सुरु करावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, येथे मा.सभागृह नेत्याची लिंक बरोबर नाही, कोणत्याही सदस्यांना व्यवस्थित ऐकायला येत नाही त्यामुळे आपण अशा प्रकारे सभागृह चालवुच शकत नाही.

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, जर या पध्दतीने सभागृह चालत असतील तर हे बरोबर नाही त्यामुळे आपण सुरेश भट सभागृह येथे सभागृह घेतले पाहिजे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, येथे कोणाचा आवाज कुणाला कळत नाही त्यामुळे आपण अशाप्रकारे सभागृह चालवु शकत नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेते, विरोधी पक्ष नेते यांनी याबाबत चर्चा केली पाहिजे की कोणालाही कोणाचा आवाज ऐकायला बरोबर येत नाही हा गंभीर विषय आहे.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, मागे ज्या पध्दतीने आपण सुरेश भट सभागृह येथे सभा घेतली होती त्याचपध्दतीने आपण सभा घेतली पाहिजे.

श्री.प्रदीप पोहाणे :- मा.महापौरजी, या सभेमध्ये अनेक महत्वाचे विषय आहे आणि येथे कोणाचाही आवाज कोणालाही ऐकायला येत नाही.

महापौर :- बाकी सगळया मा.सदस्यांनी आपले मोबाईल म्युट करावे. विरोधी पक्ष नेत्यांनी आपले मत कृपया सांगावे. ज्या पध्दतीने सर्व प्रक्षेपण होत आहे आणि आवाज येत नाही हे बघता सभागृह दहा मिनिटांकरिता स्थगित करण्यात येते.

**हस्ता /- निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**हस्ता /- महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**